# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# पाटणमध्ये रविवारी जिल्हा ग्रंथालय संघाचे अधिवेशन

## विविध क्षेत्रातील मान्यवरांचा होणार गौरव : साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या हस्ते उद्घाटन

**वार्ताहर**
पाटण

नागोजीराव पाटणकर स्मारक वाचनालय व पाटण तालुका ग्रंथालय संघ यांच्या विद्यमाने जिल्हा ग्रंथालय संघाचे ५२ वे अधिवेशन रविवार २९ रोजी बाळासाहेब देसाई कॉलेजमधील डॉ. अब्दुल कलाम सभागृहात आयोजित केले आहे. यावेळी वार्षिक सभा, पुरस्कार प्रदान व परिसंवाद होत असून ग्रंथालय पदाधिकारी, ग्रंथपाल व सेवक तसेच ग्रंथप्रेमींनी उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष यशंवत पाटणे यांनी केले आहे.

सकाळी १० ते ५ यावेळेत आयोजित अधिवेशनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्राचार्य सुनिलकुमार लवटे यांचे हस्ते होणार आहे.अध्यक्षस्थानी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर असणार आहेत. यावेळी सातारा जिल्हा बॅंकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, सहाय्यक धर्मादाय अधिकारी एस. एस. मांजरेकर, शासकीय जिल्हा ग्रंथालय अधिकारी श्रीनिवास मंगलपल्ली, भाजपचे जिल्हा सरचिटणीस याज्ञसेन पाटणकर, नगराध्यक्षा अनिता देवकांत, प्राचार्य विलास कळंत्रे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांना तसेच वाचनालयांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. यामध्ये यशवंतराव चव्हाण आदर्श ग्रामीण ग्रंथालय पुरस्कार–सुरूची महिला ग्रंथालय कराड, जे. एस. जाधव सार्वजनिक ग्रंथालय सणबूर, महिला सार्वजनिक वाचनालय खोजेवाडी तसेच महात्मा फुले .आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार डॉ. राजेंद्र भास्कर माने, डॉ. एस. आर. रंगनाथन आदर्श ग्रंथपाल पुरस्कार महेश दाजी कदम, श्रीपाद मोफत वाचनालय पाटण, कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श ग्रंथालय सेवक पुरस्कार उमा दत्तात्रय सावंत, हिंद नगर वाचनालय रहिमतपूर, ग्रंथमित्र डॉ. शिवाजीराव चव्हाण स्मृती पुरस्कार प्रा. बाळासाहेब जगन्नाथ कोकरे वाई, स्व. विष्णू व स्व. भाऊसाहेब नलावडे स्मृतीप्रित्यर्थ–सेवाव्रती पुरस्कार कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, दादासाहेब पाटील स्मृतीप्रित्यर्थ कृतज्ञता पुरस्कार रोहित शिंदे, प्रा. भास्करराव माने स्मृतीप्रित्यर्थ ग्रंथभास्कर पुरस्कार डॉ. अदिती काळमेख, लेखिका यमुनाबाई सावंत, स्व. श्रीहरी सावंत स्मृतीप्रित्यर्थ मातृ–पितृवंदना पुरस्कार लिलावती पोळ कवठे, स्व. बाबूराव शेटे पुरस्कृत ग्रंथपाल विठ्ठलराव पाटील स्मृती पुरस्कार– अकबर काझी, ग्रंथपाल, श्री रामदास मोफत वाचनालय शिरवळ, स्व. डॉ. विनायकराव गायकवाड ग्रंथसोबती पुरस्कार– शिरीष सावंतयांना प्रदान केला जाणार आहे.

### धर्मादाय संस्थांच्या कामकाजाविषयी होणार मार्गदर्शन

यावेळी आयोजित दुसऱ्या सत्रात परिसवांद होणार असून सहाय्यक धर्मादाय आयुक्त एस. एस. मांजरेकर यावेळी उपस्थित राहून सार्वजनिक धर्मादाय संस्थाच्या कामकाजाविषयी मार्गदर्शन करणार आहेत. तरी सर्वांनी यावेळी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.